महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

Lokneta News - लोकनेता न्युज

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

बुधवार दि.२५ मार्च २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २२१ किंमत २ रुपये 7499615933

# भोंदू अशोक खरात प्रकरणावरून अंधश्रद्धेविरोधात कठोर कारवाईची मागणी; 'मअंनिस' बीडचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बीड । विजय रोडे**



नाशिक येथे उघडकीस आलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात सुरू असलेल्या अंधश्रद्धा, बुवाबाजी, सत्ता व संपत्तीच्या संगनमतातून होत असलेल्या महिलांच्या शोषणाविरोधात कठोर आणि व्यापक कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (मअंनिस) बीड शाखेने केली आहे. याबाबतचे सविस्तर निवेदन मा. मुख्यमंत्री महोदयांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आले.या निवेदनाचे नेतृत्व विवेक वाहिनीच्या राज्य कार्याध्यक्ष प्राचार्य सविता शेटे यांनी केले असून, केवळ अशोक खरात या एका आरोपीपुरते प्रकरण मर्यादित न ठेवता, त्यामागील संपूर्ण रॅकेट व संगनमत उघड करण्याची मागणी करण्यात आली आहे. अंधश्रद्धा, भीती, असुरक्षितता व अज्ञानाचा फायदा घेत 'दैवी शक्ती', 'अध्यात्म' आणि 'फलज्योतिष'च्या नावाखाली महिलांचे व सर्वसामान्यांचे होत असलेले शोषण अत्यंत चिंताजनक असल्याचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

मअंनिसने या प्रकरणाची निष्पक्ष, निर्भय व पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अधिनियम, २०१३ या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासोबतच, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली नियमावली तातडीने पूर्ण करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. राज्यघटनेने अधोरेखित केलेल्या 'वैज्ञानिक दृष्टिकोन' मूल्यांची जपणूक करण्यासाठी शाळा, महाविद्यालये व समाजात व्यापक जनजागृती मोहीम राबवावी. तसेच, राजकीय पक्ष व नेत्यांनी भोंदू बाबा, बुवा, मांत्रिक व ज्योतिषी यांच्याशी असलेले संबंध तत्काळ तोडून विवेकी आचारसंहिता तयार करावी, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली आहे.

अशोक खरातसारखी प्रकरणे राज्यभर असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सर्व जिल्हा पोलीस प्रशासनाला विशेष तपासाचे स्पष्ट निर्देश देऊन गुन्हे नोंदविण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.या निवेदनावर मअंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, विवेक वाहिनीच्या प्राचार्य सविता शेटे, जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य कॉ. डी. जी. तांदळे, बीड शाखा कार्याध्यक्ष प्रा. विजय घेवारे, विधिज्ञ कॉ. करुणा टाकसाळ, रामधन जमाले (इंटक) प्रतिक राऊत, आदित्य वीर, नितीन रांजवण, अनिता जोगदंड, मीरा डोईफोडे, बाजीराव ढाकणे, शुभांगी कुलकर्णी, कौशल्या बावने, राणी कातखेडे, डॉ. संजय तांदळे, प्रवीण सोनवणे, शेख अमर पाशा, किरण घाडगे, रुक्मिणी नागापुरे, तेजस्विनी भाटे, रणजित माने आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्यार्थ्यांसाठी केलेली गुंतवणूक भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची-पद्मश्रीताई धर्माधिकारी

## डॉ.आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने नगरसेविका कविता इंगळे यांच्याकडून वाचनालयास पुस्तके भेट

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बीड । विजय रोडे**



विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांसाठी केलेली गुंतवणूक भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन परळीच्या नगराध्यक्षा सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.त्या डॉ.भालचंद्र वाचनालयासाठी नगरसेविका कविता अनंत इंगळे यांच्यावतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभ्यासिकेसाठी स्पर्धा पुस्तके भेट देण्यात आली.त्या स्विकारतांना त्या बोलत होत्या.

नगरसेविका सौ .कविता अनंत इंगळे यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ जयंती निमित्ताने परळीचे वैभव असलेल्या डॉ.भालचंद्र वाचनालयातील स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट दिली. ही पुस्तके नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, पत्रकार अनिरुद्ध जोशी,शंकरराव साळवे, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ दाने यांच्या हस्ते मुलांना अभ्यासासाठी देण्यात आली. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थ्यानिंना मार्गदर्शन केले.तसेच वाचनालय आणि अभ्यासिकेसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले.याप्रसंगी रानबा गायकवाड यांनी नगरसेविका कविता अनंत इंगळे यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दिलेल्या पुस्तकांविषयी आणि बाबासाहेबांच्या ग्रंथ प्रेमाबद्दल माहिती दिली.याप्रसंगी अशोक दहिवडे, पत्रकार महादेव गिते, जयराम गोंडे, रावसाहेब जगतकर यांच्यासह विद्यार्थी ,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छावा क्रांतिवीर सेनेच्या परळी तालुकाध्यक्ष पदी पृथ्वीराज उंबरे पाटील यांची निवड!



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बीड । विजय रोडे**

भारतीय संविधानाने सर्वसामान्य नागरिकांना दिलेले अधिकार व हक्क मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेल्या छावा क्रांतीवीर सेना या संघटनेच्या परळी तालुकाध्यक्षपदी पृथ्वीराज उंबरे पाटील यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

ही निवड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी प्रदेशाध्यक्ष शिवाजीराजे मोरे, बीड जिल्हाध्यक्ष राहुल चाळक पाटील, नवनाथ शिंदे, नितीन शिंदे, नांदेड जिल्हाध्यक्ष बालाजी ढगे पाटील, मराठवाडा कामगार अध्यक्ष युवराज घाडगे पाटील, राम पाटील तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. नाशिक येथे झालेल्या या कार्यक्रमात उंबरे पाटील यांच्या निवडीची अधिकृत घोषणा करण्यात आली.

संघटनेत कार्यकर्ता म्हणून प्रामाणिक व समाधानकारक कामगिरी, तसेच प्रशिक्षण शिबिरांमध्ये सक्रिय सहभाग यामुळेच त्यांची या पदासाठी निवड करण्यात आली असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बीडमध्ये 'महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा'चे आयोजन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बीड । विजय रोडे**



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बीड शहरात 'महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती, बीड शहर यांच्या वतीने ही स्पर्धा दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्साहात आयोजित केली जात आहे.गेल्या पंधरा वर्षांपासून सातत्याने आयोजित केल्या जाणाऱ्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, यंदाही जिल्ह्यातील इयत्ता ८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे. तालुकास्तरीय पहिली फेरी दिनांक ३० मार्च २०२६, सोमवार रोजी सकाळी १०वाजता होणार आहे. या फेरीतून प्रत्येक तालुक्यातील अनुक्रमे पहिले १० विद्यार्थी अंतिम फेरीसाठी निवडले जाणार आहेत. अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या अकरा तालुक्यांतील विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा दिनांक ०५एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तुलसी महाविद्यालय, बीड येथे पार पडणार आहे.स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

प्रथम क्रमांकासाठी ७००० रुपये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकासाठी ५०००.रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, तर तृतीय क्रमांकासाठी ३००० रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.स्पर्धेचे प्रवेश शुल्क प्रति विद्यार्थी ५० रुपये ठेवण्यात आले असून, बीड जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.या उपक्रमासाठी संयोजक आयु. मनोज वाघमारे, आयु. सुमित जोगदंड सर, स्पर्धा समिती प्रमुख प्रा. शशिकांत जावळे, प्रवीणकुमार तरकसे सर, प्राचार्य प्रदीप गाडे, श्री भारत मगर, महादेव इनकर, प्रा. अशोक गायकवाड यांच्यासह सर्व समिती सदस्य परिश्रम घेत आहेत.अधिक माहितीसाठी स्पर्धा समिती प्रमुख

प्रा. शशिकांत जावळे ९४२३४७३२०४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुणे येथे राज्यस्तरीय 'कर्तृत्व गौरव पुरस्काराणे माया दिवाण यांचा सन्मान

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**पुणे । प्रतिनिधी**





नालंदा फाउंडेशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय 'नालंदा कर्तृत्व गौरव पुरस्कार सोहळा २०२६' मध्ये माया दिवाण यांना 'कर्तृत्ववान महिला गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा प्रतिष्ठेचा सोहळा २१ मार्च २०२६ रोजी पत्रकार भवन, पुणे येथे उत्साहात पार पडला.महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालयात नोंदणीकृत असलेल्या नालंदा फाउंडेशनतर्फे राज्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदा माया दिवाण यांच्या समाजाभिमुख कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.माया दिवाण यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत समाजासाठी दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान दिले आहे. लेखिका, कवयित्री, म्हणून त्यांची कार्य अधोरेखित आहे. समाजनिर्मितीसाठी त्यांनी अनेक वर्षे अविरत परिश्रम घेत प्रेरणा व सकारात्मक ऊर्जा निर्माण केली आहे. त्यांच्या लेखनातून व कवितेतून सामाजिक बांधिलकी, सृजनशीलता आणि समर्पण यांचे उत्कृष्ट दर्शन घडते.या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला अधिक बळ मिळणार असून, समाजातील महिलांसाठी त्या प्रेरणादायी आदर्श ठरत आहेत. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे आयोजन नालंदा फाउंडेशनतर्फे करण्यात आले होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. दिपक दादाराव जाधव (टॅलेंटकट्टा) यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.जागतिक महीला दिन २०२६ चे औचित्य साधुन बीड येथे श्री. छत्रपती शाहु समाज प्रबोधन मडळ बीड तर्फे देखिल ८ मार्च २०२६ रोजी छत्रपती शाहु कर्तुत्ववानमहिला गौरव पुरस्कारने त्यांचा सनमानीत केले होते.दोन्ही पुरस्कारा बद्दल महामानव अभिनंदन ग्रुप, वाचल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय, धम्मदिप बुद्धविहार महिला मंडळ. अँड.तेजस वडमारे, प्रा. डॉ.नामदेव शिनगारे, व मित्र परिवारने पुढील कार्यास शुभेच्छा देऊन मंगल कामना व्यक्त केल्या.

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी मीरा बोरवणकर यांची नियुक्ती करा; शिवसेना महीला संपर्कप्रमुख सौ.रत्नमाला मुंडे यांची मागणी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांवरील वाढते अत्याचार आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना, असंख्य महिलावर अत्याचार करणाऱ्या तथाकथित भोंदू बाबाच्या विळख्यात अडकलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यामुळे अन्यायाच्या मगर मिठीतून मुक्त झालेल्या 'राज्य महिला आयोगा'चे अध्यक्षपद एका खंबीर आणि अनुभवी व्यक्तीकडे सोपवण्यात यावे, अशी मागणी जोर धरू लागली असतानाच शिवसेना महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख सौ.रत्नमाला मुंडे यांनी माजी आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांच्या नावाची शिफारस केली असून, बोरवणकर यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष व अनुभवी महिला अधिकाऱ्यामुळेच पिडीत महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.बोरवणकर यांच्या नावाची शिफारस करण्याची कारणे सांगताना सौ.रत्नमाला मुंडे यांनी आपल्या मागणीत मीरा बोरवणकर यांच्या कामाचा गौरव केला आहे. त्या म्हणाल्या की, मीरा बोरवणकर यांनी पोलीस दलात काम करताना अनेक गुंतागुंतीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. विशेषतः महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये त्यांनी घेतलेली कठोर भूमिका वाखणण्याजोगी आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या स्मरणात आहे.तसेच बोरवणकर यांची ओळख एक 'निर्भीड आणि खमक्या अधिकारी' म्हणून आहे. महिला आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थेला अशाच कणखर नेतृत्वाची गरज आहे, जे कोणाच्याही दबावाखाली न येता पिडीतांना न्याय मिळवून देईल. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आयपीएस अधिकारी म्हणून मीरा बोरवणकर यांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे बारकावे जवळून पाहिले आहेत, ज्याचा फायदा आयोगाच्या कामकाजात चांगल्या प्रकारे होईल. सरकारने आता तरी राजकीय पुनर्वसनापेक्षा कामाला प्राधान्य द्यावे अशी ही मागणी त्यांनी केली.

यावेळी बोलताना मुंडे यांनी सत्ताधाऱ्यांवर अप्रत्यक्ष निशाणाही साधला. राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद हे केवळ राजकीय पुनर्वसनाचे साधन बनू नये. तिथे अशा महिलेची नियुक्ती व्हावी, जिने प्रत्यक्ष जमिनीवर उतरून महिलांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी लढा दिला आहे. मीरा बोरवणकर यांचे नाव या पदासाठी अत्यंत योग्य आणि न्यायपूर्ण आहे, असे मुंडे यांनी स्पष्ट केले.

# य.च.म.मुक्त विद्यापीठ विभागीय केंद्र नांदेड येथे रोजगार मेळाव्याचे शुक्रवारी आयोजन

## वरिष्ठ शै. सल्लागार डॉ.यशवंत कलेपवार यांचे सहभागी होण्याचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । संजय यलमवाड**

: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र नांदेड व युवाशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यामाने युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा दिनांक २७ मार्च रोज शुक्रवारी आयोजित करण्यात आला असून, विविध नामांकित कंपन्यांच्या माध्यमातून नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र नांदेडचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. यशवंत कलेपवार यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.या रोजगार






मेळाव्यात सुमारे २ हजार पेक्षा अधिक रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. नांदेड विभागातील (लातूर, हिंगोली, परभणी, नांदेड) विद्यार्थ्यांना या मेळाव्याचा विशेष लाभ होणार आहे. विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी संधी उपलब्ध असून, बारावी पास, आयटीआय (सर्व ट्रेड), डिप्लोमा - इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, इंजिनिअरिंग तसेच उछ्उ ऑपरेटर, उखझएढ अशा विविध क्षेत्रांतील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. सदर रोजगार मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी स्वतःचा प्रवास खर्च करणे आवश्यक असून, निवड झालेल्या उमेदवारांना पुढील प्रक्रिया संबंधित कंपन्यांकडून पूर्ण करण्यात येणार आहे. महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांना या मेळाव्यासाठी प्रोत्साहित करून मार्गदर्शन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मेळाव्यासाठी इच्छुक उमेदवारांनी खालील लिंकवरून नोंदणी करावी:

https://forms.gle/wQjzGTViQUd-TqeY9हा रोजगार मेळावा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागीय केंद्र नांदेड, मराठवाडा विद्यापीठ परिसर, नानकवाडी कमान, झरी रोड विष्णुपुरी नांदेड येथे पार पडणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांकः

९१५७३२९४८४, ८२९९८४५९१०, ९८२२२२५८५८, ८२७५०३६२५३या उपक्रमामुळे नांदेड जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. यशवंत कलेपवार यांनी केले आहे.

# जिजाऊ ब्रिगेड लातुर (पुर्व) आयोजीत जिजाबाई मारुती माने यांना नारीरत्न पुरस्काराने सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिवन जाधव । औसा**

लातुर जिल्यातील नावलौकीक व समाजासाठी समाजकार्य व सर्वसमावेशक महिलांच्या न्याय

हक्कासाठी आपल योगदान देणारी मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेडच्या वतिने दिला जाणारा मानाचा नारीरत्न पुरस्कार सोहळा साजरा करण्यात आला ,या नारीरत्न पुरस्कार सोहळ्यात आपचुंदा येथील जिजाबाई माने यांच्या कार्याची दखल घेत जिजाऊ ब्रीगेडच्या जिल्हाध्यक्षा लातुर ( पुर्व ) शिवमती अर्चनाताई शिवाजीराव पाटील यांनी ग्रामिण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील जिजाबाई माने यांचा महिला उद्योजीका नारीरत्न पुरस्काराने गौरव केला,आपचुंदा येथील जिजाबाई माने या गेल्या वीस वर्षापासुन किराणा दुकानाच्या माध्यमातुन व्यवसाय करतात ,जिजाबाई माने यांचे पतीच निधन



झाल्यानंतर त्यांना संतती नसल्याने पुढील जिवन हे संघर्षमय असल्याने त्यांना समाजसेवा करण्याची आवड याच आवडी पोटी त्यांनी गावातच छोटेखानी किराना दुकान चालवत त्यातुन मीळणार्या नफ्यातुन त्या आपचुंदा गावातील महिलांना व गरजु मुलमुलींना आधार देतात ,व गावातील महिलांना सक्षमिकरण करण्यासाठी सदैव धडपड करत असतात त्यामुळे त्यांच्या समाजकार्याची दखल घेउन जिजाऊ ब्रिगेड लातुर (पुर्व) च्या वतिने त्यांना नारीरत्न पुरस्कार देउन त्यांचा गौरव करण्यात आला आहे ,यावेळी ,सागरबाई बनसोडे ,कोमल सुर्यवंशी ,सत्यभामा लाखे,शितल माने ,पुजा माळी ,अयोध्या जाधव ,संध्याराणी साठे सह महिला उपस्थीत होत्या ,

# सीमावरती भागातल्या रस्त्याचा लोकप्रतिनिधी ना पडला विसर, हाणेगाव ते उदगीर जाणारा शिळवानी रस्ता गेला उखडून

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हाणेगाव । प्रल्हाद नाईकवाडे हणेगाव**

महाराष्ट्र कर्नाटक व तेलंगाना या तीन राज्यांच्या सीमेवर असलेल्या हानेगाव ते उदगीर- शीळवणी मार्गे रस्ता पूर्णपणे उखडून गेल्याने डांबरीकरण झालेल्या पक्क्या रस्त्याचे रूपांतर कच्चा रस्त्यात झाल्याचे चित्र स्पष्ट दिसते, सदरील रस्त्यावरून तेलंगणातील जूकल, कर्नाटकातील औराद, हाणेगाव परिसरातील २०० खेड्यापाड्यातील नागरिक उदगीर येथे व्यापारी बाजारपेठ खरेदीसाठी, शिक्षणासाठी, आरोग्य विषयक नेत्र विभाग व आकस्मित अपघात प्रसंगी तातडीने उदगीर गाठण्यासाठी.., यासह विविध आजाराचे रुग्ण उपचार घेण्यासाठी जवळ असल्याने उदगीर गाठतात मात्र मात्र



वरील प्रवाशांना मुख्य स्त्रोत असलेला रस्ता ओलांडण्यासाठी मरण यातना भोगत रस्ता पार करावा लागतो... तातडीच्या आरोग्य विषयक समस्या उद्भवल्यास रुग्णवाहिका कोणता मार्ग निवडायचा.? देगलूर कडे. का?, कर्नाटकातील औराद कडे. का? की? शिळवणी मार्गे.. उदगीर कडे...? असे हृदय द्रावक अनुभव परिसरातील नागरिकांना दररोज अनुभवताना दिसत आहेत

**हाणेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरातील नागरिकांसाठी वरदान ठरत आहे.व उदगीर सारखा तालुका जिल्हा होण्याच्या मार्गावर आहे.. परंतु सदरील रस्त्यामुळे नागरिकांना सुविधा मिळण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे संबंधित विभागाने रस्ता नव्याने करून सदरील नागरिकांना समस्येतून मुक्त करावे – रमेश राव देशमुख शिळवणीकर मा. जिल्हा परिषद उपाध्यक्ष जिल्हा परिषद नांदेड**

मात्र... संबंधित विभाग व निवडणुकीच्या प्रचारादरम्यान लबाड आश्वासन देणारे लोकप्रतिनिधींना दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला आहे.. सदरील रस्ता नव्याने व्हावे अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे..

# अरबी समुद्रावर पाटील कुटुंबाची मोहोर! स्वराज पाटीलने ३६ कि.मी.चे 'धर्मतर ते गेटवे' अंतर ९ तास ४९ मिनिटांत कापले

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । विठ्ठल ममताबादे**

जिद्द, चिकाटी आणि अंगात असलेल्या उपजत जलतरण कौशल्याच्या जोरावर उरणच्या स्वराज सोनाली संतोष पाटील या तरुण जलतरणपटूने अरबी समुद्रात एक नवा इतिहास रचला आहे.

स्वराजने मध्यरात्री बरोबर २:०० वाजता धर्मतर जेटीवरून समुद्रात उडी मारून आपल्या या आव्हानात्मक मोहिमेला सुरुवात केली. अथांग समुद्राच्या गडद अंधारात आणि लाटांशी झुंज देत स्वराजने धर्मतर ते गेटवे ऑफ इंडिया हे तब्बल ३६ किलोमीटरचे अंतर केवळ ९ तास ४९ मिनिटांत यशस्वीपणे पार केले.

स्वराजसाठी 'धर्मतर ते गेटवे' ही मोहीम अचानक मिळालेले यश नाही, तर त्यामागे त्याची टप्प्याटप्प्याने केलेली तयारी आहे. याआधी त्याने 'मोरा ते गेटवे




ऑफ इंडिया' हे अंतर यशस्वीपणे पोहून पार केले होते. त्यानंतर त्याने 'कासा खडक ते खांदेरी किल्ला' या ऐतिहासिक जलमार्गावरही आपली मोहोर उमटवली होती. या लहान पण आव्हानात्मक मोहिमांमधील यशामुळेच त्याला ३६ कि.मी.च्या या महा-मोहिमेसाठी आत्मविश्वास मिळाला.

स्वराजचे हे यश केवळ वैयक्तिक नसून, ते एका 'जलतरणपटू कुटुंबाच्या' परंपरेचा भाग आहे. स्वराजला हा वारसा त्याची आई सोनाली संतोष पाटील यांच्याकडून मिळाला आहे, ज्यांनी २५ वर्षांपूर्वी याच मार्गावर पोहून आपली ओळख निर्माण केली होती. या मोहिमेत स्वराजला मामा संतोष पाटील, मामा जयेश पाटील आणि भाऊ राज पाटील यांचे मोलाचे प्रोत्साहन मिळाले. त्याला अनुभवी प्रशिक्षक मामा हितेश पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. धर्मतर ते गेटवे हा समुद्री मार्ग जलतरणपटूंसाठी अत्यंत कठीण मानला जातो. मध्यरात्री २ वाजता सुरू झालेल्या या मोहिमेत सुरुवातीचे काही तास स्वराजला पूर्णतः अंधारात पोहावे लागले. वाटेत येणारे भरती-ओहोटीचे प्रवाह, जेलीफिशचा धोका आणि मोठ्या जहाजांची वर्दळ या सर्वांवर मात करत स्वराजने सातत्य राखले. प्रशिक्षक मामा हितेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेल्या कठोर सरावाचे फळ आज स्वराजला मिळाले आहे.

जसा स्वराज गेटवे ऑफ इंडियाच्या पायऱ्यांजवळ पोहोचला, तसा तिथे उपस्थित असलेल्या कुटुंबियांनी जल्लोष केला. आईने २५ वर्षांपूर्वी जे स्वप्न पाहिले होते, ते आज मी पूर्ण करू शकलो याचा मला सार्थ अभिमान आहे, अशा भावना स्वराजने विजयानंतर व्यक्त केल्या. एकाच कुटुंबातील आई, आजोबा, भाऊ, मामा आणि आता स्वतः स्वराज अशा सर्वांनीच समुद्रावर आपले नाव कोरल्यामुळे पाटील कुटुंब हे खऱ्या अर्थाने 'समुद्रपुत्र' म्हणून ओळखले जात आहे.

स्वराजच्या या कामगिरीमुळे आगामी काळात जागतिक स्तरावरील इंग्लिश चॅनेल (एपसश्रळीह उहरपपशश्र) सारख्या कठीण स्पर्धांसाठी त्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# अजिंठा लेणी पायथ्याशी फर्दापूर मध्ये भंगार दुकानाला भीषण आग

## लाखोंचे नुकसान,अग्निशमन यंत्रणेअभावी अडचणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**फर्दापूर । दिपक बलांडे**

जगप्रसिद्ध अजिंठा लेणीच्या पायथ्याशी असलेल्या फर्दापूर गावाजवळील रस्त्यावर मंगळवारी एका भंगार दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली. आग इतकी भडकली होती की काही काळासाठी रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली होती. स्थानिक ग्रामस्थांच्या प्रयत्नांमुळे आणि गावातील पाण्याच्या टँकरच्या मदतीने अखेर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

या आगीत दुकानमालक रिजवान शेख यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून दुकानातील सर्व भंगार साहित्य आणि दुकान पूर्णपणे जळून खाक झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत अधिक तपास सुरू आहे.

घटनेदरम्यान परिसरात अग्निशमन दलाची गाडी उपलब्ध नसल्यामुळे आग विझवण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत पाण्याचे टँकर बोलावून आग नियंत्रणात आणली,



मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

या घटनेनंतर सामाजिक कार्यकर्ते अजहर शेख यांनी प्रशासनावर टीका करत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. अजिंठा लेणीसारख्या आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळाच्या जवळ असलेल्या फर्दापूरमध्ये अग्निशमन यंत्रणेची सुविधा नसणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. अशा परिस्थितीत भविष्यात मोठा अनर्थ घडू शकतो, असे त्यांनी सांगितले. तसेच, प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन येथे कायमस्वरूपी अग्निशमन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.दरम्यान, या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने या प्रकरणी त्वरीत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# ज्ञानेश्वर कौसाईतकर यांना आदर्श कलाध्यापक पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ, पुणे महाराष्ट्र शासन,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । रमेश मुलगीर**

परभणी :-पुणे मान्यता प्राप्त

जावक क्र.: १०६/२०२६

दि: १६.०३.२०२६

नेताजी सुभाष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मानवत ता. मानवत जि. परभणी नेताजी सुभाष विद्यालयाचे कलाशिक्षक ज्ञानेश्वर सूर्यभान कौसाईतकर महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ मार्फत राज्यस्तरीय आदर्श कलाध्यापक पुरस्कार २०२६ यांना जाहीर झाला आहे.

त्या निमित्त नेताजी सुभाष विद्यालयात त्यांचा मुख्याध्यापकांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. व शुभेच्छा देण्यात आल्या त्यावेळी उपस्थित मुख्याध्यापक संजय लाड सर, उप मुख्याध्यापक विश्वनाथ बुधवंत सर, अशोक काळे सर, गणेश सिरसकर सर,धनंजय गरुड सर, सुनिल लाड सर, शेषराव ढगे सर, शिवाजी रणवीर सर, सदाशिव होगे सर,नंद होत आहे की, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व



प्रशिक्षण परिषद, पुणे मान्यता प्राप्त, महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ, पुणे मार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श कलाध्यापक पुरस्कार - २०२६ या पुरस्कारासाठी शैक्षणिक, सामाजिक, संघटनात्मक, कलात्मक उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन जिल्हा संघाच्या शिफारशींनुसार आपल्या शाळा/विद्यालयातील खालील कलाशिक्षक ज्ञानेश्वर सूर्यभान कौसाइतकर यांची निवड करण्यात आलेली आहे.

सदर पुरस्कार वितरण समारंभ दिनांक २८ व २९ मार्च २०२६ (शनिवार व रविवार) रोजी कला शिक्षण परिषद (कार्यशाळा) चे आयोजन सातारा येथील स्व. यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृह, जिल्हा परिषद सातारा येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

करिता पुरस्कार स्वीकारण्यासाठी निवड झालेल्या कलाशिक्षक यांनी उपस्थित राहावे ही विनंती.

# तेलगाणा येथील बंजारा समाजाचे दीक्षाधारी सेवा भक्त जरूर तांडा येथे एक दिवसीय मुकाम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांडवी । डॉ.भारत उद्धव राठोड**

मांडवी! पूज्य दीक्षागुरु प्रेमसिंग महाराज कोतापल्लीकर यांच्या मार्गदर्शनाखाली बंजारा समाजाचे विस हजार सेवादीक्षा महिला, पुरुष लहान मुले भक्त यांनी जरूर येथे एक दिवसीय मुकाम करून भोजनाचा अन्नदाण करण्यात आले

प्राथमिक आरोग्य केंद्र कोठारी सि येथील वैद्यकीय अधिकारी श्री डॉ. काळे सर यांच्या निदेशनाखाली सर्वे सेवालाल भक्ताचे आरोग्य तपासणी करण्यात आली या वेळी डॉ. राहुल पवार सह सर्व आरोग्य टीम उपस्थित होते . जरूर तांडा येतील नाईक कारभारी यांनी गातील लोकांनी दहा एकर जमिनीचे वेवस्था करून दिले तेथे टेन्ट पेंन्डाल संडास बाथरूम ची पण वेवस्था करण्यात आली आणि एक दिवसीय मुकाम करून बंजारा समाजाची काशी पोहरागड येथे रवाना झाले.

तेलंगणा राज्यातील बोयाराम.पिटगाव ते पोहरागड १७ मार्च पासून पदयात्रेला सुरुवात झाली आहे

या पदयात्रेत जवळपास विस हजाराच्या वर सेवालाल दीक्षा भक्त सामील आहे दि २५ मार्च रोजी बंजारा समाजाची काशी पोहरागड येथे संत श्री सेवालाल महाराजांची भव्य पूजा अर्चना केली जाते या कार्यक्रमात सामील होऊन दीक्षा सेवा भक्त आपले दीक्षा पूर्ण करून सेवालाल महाराजांचे पूजा दर्शन करून पुन्हा आपल्या घरी पदयात्रा वापस येतात

दीक्षा सेवालाल भक्त आज दि २२मार्च रोजी कणकी तांडा येथे दाखल झाले असता (कणकी तांडा येथील श्री.विकासजी शेषराव नाईक. श्री. पवन राजाराम चव्हाण. यांच्या मार्गदर्शनाखाली..)

संत श्री सेवालाल महाराज मंदिर चे पुजारी श्री.गणपत पिगलवार व श्री. यशवंत काळुराम जाधव यांनी चांगल्याप्रकारे चहा फराळाची वेवस्था केली. मदिरा मध्ये विस हजार भक्तांना उपहार देऊन सन्मानाने पोहरागडाकडे रवाना करण्यात आले. यावेळी गातील नागरिकही उपस्थित होते..





## गणेश खराडे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हा सरचिटणीस पदी निवड



लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते गणेश खराडे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या जिल्हा सरचिटणीस पदी निवड करण्यात आली

राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा माजी खासदार शरदचंद्र पवार यांच्या आदेशाने राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे धाराशिव जिल्हाध्यक्ष शेखर घोडके यांनी प्रताप सिंह पाटील जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस जीवनराव गोरे रवींद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडीचे पत्र देऊन स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

## नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समितीसदस्यांचा सत्कार


लोकनेता न्यूज नेटवर्क

**औसा । महेश कोळी**

दिनांक २४/०३/२०२६ रोजी जिल्हा परिषद प्रशाला बेलकुंड शाळेच्या वतीने.जि.प.गटातील नवनिर्वाचित सदस्या सौ.दिपाली शाम (बापू)भोसले (मातोळा गट),आणि सईताई पृथ्वीराज गोरे(आशिव गट)व उजनी गटातील सदस्यसंदिपान शेळके तसेच पंचायत समिती सदस्य समाधान कांबळे व परमेश्वर लांडगे

यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व सत्कारमूर्तींनी आपापले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व प्रशालेच्या गुणवत्तेचेही भरभरून कौतुक केले या कार्यक्रमाचेअध्यक्ष म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक शेख सर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राम माने

उपाध्यक्ष अनंत शिंदे बेलकुंड गावचे सरपंच विष्णू कोळी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य महेश कोळी, गणेश यादव, सोमनाथ



कांबळे, गोविंद वाघमारे आणि महिला सदस्य सरोजा साळुंके, सोनाली पांढरे तसेच गावातील ग्रामस्थ, महिला पालक,प्रशालेतील सर्व शिक्षक व प्रशालेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी आपल्या मंजूळ आवाजात स्वागत गीत गाऊन आलेल्या पाहुण्यांचे शब्द सुमनाने स्वागत केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीक्षित सरांनी केले .सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेतील शिक्षक कर्मचारी मिटकरी सरांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शेख सर यांनी अध्यक्षीय समारोप केला व कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन मुंडे सरांनी केले.

## ट्रॉसिटी चा गुन्हा दाखल होताच आरोपींना तात्काळ अटक करा–आर्यनराजे शिंदे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

ट्रॉसिटी चा गुन्हा दाखल होताच आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी वैशाली बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष आर्यनराजे शिंदे यांनी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण धाराशिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबध अधिनियम १९८९ हा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील नागरिकांवर होणारे अन्याय अत्याचार रोखण्यासाठी लागू करण्यात आलेला विशेष कायदा आहे. सदर कायद्यामध्ये सन २०१८ मध्ये सुधारणा करून कलम १८ अ सामाविष्ट करण्यात आला या कलमानुसार ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यापूर्वी कोणतीही स्थानिक चौकशी करण्याची आवश्यकता नाही गुन्हा हा दाखल झाल्यानंतर आरोपींना अटक करण्याची कोणतीही सक्षम अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यकता नाही आरोपीस अग्रिम जमीन देण्यास मनाई आहे. प्रतीक्षा काही ठिकाणी ऍट्रॉसिटी चा गुन्हा दाखल झाल्यास आरोपींना अटक होत नाही त्यामुळे पीडित व्यक्तींना न्याय मिळण्यास विलंब होतो. तसेच कायद्याचाही उद्देश पूर्ण होत नाही त्यामुळे आपण जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे सचिव या नात्याने धाराशिव जिल्ह्यातील सर्व उपवागीय पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक व संबंधित पोलीस यंत्रणा यांना सूचना देऊन अंतर्गत गुन्हा दाखल होताच संशोधित कलम १८ अ नुसार तात्काळ अटक करण्याबाबत आदेश देण्यात यावे अशी मागणी वैशाली बहुदेशीय संस्थेचे अध्यक्ष आर्यनराजे शिंदे यांनी निवेदनाद्वारे केली



## पत्रकारांना सर्वसाधारण सभेत प्रवेश द्या–नगरसेवक चंद्रमणी गायकवाड यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

दि. २५ मार्च रोजी नगर परिषदेत होणाऱ्या सर्वसाधारण सभेत पत्रकारांना प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी नगरसेवक चंद्रमणी गायकवाड यांनी केली आहे. याबाबत नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना पत्र देऊन त्यांनी ही मागणी अधिकृतपणे मांडली आहे.नगर परिषदेत होणाऱ्या सर्वसाधारण सभांमध्ये महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. या निर्णयांची माहिती पारदर्शकपणे नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी पत्रकारांची उपस्थिती अत्यावश्यक असल्याचे गायकवाड यांनी नमूद केले.लोकशाही व्यवस्थेत पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून नागरिकांना अचूक व विश्वासार्ह माहिती देण्याचे काम पत्रकार करतात. त्यामुळे पत्रकारांना सभेत प्रवेश नाकारल्यास पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले.



त्यामुळे दि. २५ मार्च रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत पत्रकारांना प्रवेश देऊन लोकशाही मूल्यांचे पालन करावे, अशी मागणी नगरसेवक चंद्रमणी गायकवाड यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## नवोदय यशाने झळकले हरडफचे नांव विद्यार्थ्यांची नवोदय परीक्षेत बाजी;पंकज सूर्यवंशी व संस्कृती मोरे यांचा भव्य सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने आपल्या गुणवत्तेचा ठसा पुन्हा एकदा उमटवला आहे. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत या शाळेचे दोन विद्यार्थी पंकज संदीप सूर्यवंशी आणि संस्कृती भास्कर मोरे यांनी दैदिप्यमान यश संपादन केले. या यशाबद्दल शाळेच्या वतीने विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा जाहीर सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन:

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सरस्वती कोचिंग क्लासेस, परभणीचे संस्थापक अध्यक्ष नांदेडकर सर व नागेश सर, तसेच हिंदवी स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी जाधव सर उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात




नांदेडकर सर त्यांनी ग्रामीण भागातील मुलांनी मिळवलेल्या या यशाचे कौतुक करून, ही गावासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचे सांगितले.

ग्रामस्थांचा सहभाग:


कार्यक्रमाला गावातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. यामध्ये उपसरपंच बालाजी सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य रामराव सूर्यवंशी तानाजी मोरे व , ज्येष्ठ नागरिक दिगंबर सूर्यवंशी, सदाशिव सूर्यवंशी, मारोतराव मोरे! शिवाजी चंद्रवंशी! भीमराव सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच माजी विद्यार्थी गणेश सूर्यवंशी, पप्पू जाधव, संदीप सूर्यवंशी सुनिल पांचाळ नारायण शिवणतवाड आणि पत्रकार सिद्धार्थ वाठोरे यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**शालेय व्यवस्थापन:**कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका श्रीमती पावडे व्ही. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक वृंद श्रीमती चाकोरे, श्रीमती कदम, श्रीमती माकोडे, श्री. वडजे, श्री. नरवाडे, श्री. चुनाळे, श्री. पवार, श्री. गुरुमे, श्री. जीवणे आणि समस्त गावकरी मंडळ, हरडफ यांनी परिश्रम घेतले.

या यशाबद्दल संपूर्ण हदगाव तालुक्यातून पंकज आणि संस्कृतीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चिचोर्डी-वाशी जवळील बंधारा बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे





लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

तालुक्यातील मौजे चिचोर्डी –वाशी जवळील बंधारा पुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याची गंभीर बाब संबंधित गुत्तेदारा कडुन होत असल्याचे दिसून येते आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, जलसंधारण योजने अंतर्गत मौजे चिचोर्डी –वाशी जवळील बंधारा पुलाचे बांधकाम होत असताना पुलाचे कॉक्रीट बांधकाम हे माती मिश्रीत रेती व प्रमाणापेक्षा कमी सिमेंटचा वापर केल्याने कॉक्रीटला भेगा पडुन खड्डेपडत असल्याने भविष्यात वाहतुकीस धोकादायक ठरण्याची शक्यता असल्यामुळे संबंधित गुत्तेदारावर व अभियंता यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जनतेतुन होत आहे.

## नारळी सप्ताहात ऐक्याची अनोखी झलक;मुस्लिम समाजाचा लाखो रुपयांचा अन्नदान उपक्रम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथे मच्छिंद्रनाथ गड, निमगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ४८ वा नारळी सप्ताह उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडत असून, यानिमित्त गावात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी चित्र पाहायला मिळत आहे. नागनाथ देवस्थान मिडसांगवी चे मठाधिपती हनुमंत महाराज शास्त्री यांच्या प्रेरणेने या सप्ताहाचे विशेष आकर्षण ठरले ते समस्त मुस्लिम बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले एक दिवसीय अन्नदान. या पंक्तीसाठी मुस्लिम समाजाने तब्बल १ लाख २९ हजार रुपये इतकी रक्कम दिली असून, या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, मानवता आणि बंधुभावाचा उत्कृष्ट संदेश देण्यात आला.यावेळी समस्त हिंदू बांधवांच्या वतीने मुस्लिम बांधवांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सरपंच भगवान हजारे, दत्तू पाटील पठाडे, राम पठाडे, माऊली सुळ, शरद



गायकवाड, संपत पठाडे, अनिल जाधव, धनंजय पठाडे, विष्णुपंत घोंगडे सर, पिराजी सुळ माऊली निवृत्ती शिंदे जाधव तसेच मुस्लिम बांधवांमधून मुस्ताकभाई शेख, शौकत शेख, आयुब शेख बिलालभाई शेख, शफीक शेख, महम्मद सर, खलील शेख, महम्मदरफी शेख, जावेद शेख, जहूर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.दोन्ही समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परस्पर सन्मान, सहकार्य आणि एकोप्याचे हे जिवंत उदाहरण मिडसांगवी गावासाठी प्रेरणादायी ठरत आहे. मिडसांगवीतील हा नारळी सप्ताह खऱ्या अर्थाने ऐक्याचे प्रतीक ठरत असून, समाजात सद्भावना आणि एकात्मतेचा मजबूत संदेश देत आहे.

# वाढवणा पोलिसांची बेकायदेशीर जुगार अड्ड्यावर धडक कारवाई:११ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल, २३ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । एल पी उगीले**

उदगीर तालुक्यातील मौजे वाढवणा येथील पोलीस दलाने मोठे कामगिरी करत जुगार अड्ड्यावर मोठे धाड टाकले आहे. सध्या लातूर जिल्हा पोलीस दलाने बेकायदेशीर जुगार व सट्टा व्यवसायाविरुद्ध सुरू केलेल्या विशेष मोहिमेंतर्गत पोलीस स्टेशन वाढवणा (बु), ता. उदगीर यांच्या पथकाने अत्यंत धाडसी व नियोजनबद्ध कारवाई करत मौजे मन्ना (उमरगा) शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून मोठा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर कारवाईत ११ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी काही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे, तर उर्वरित आरोपी फरार आहेत. या कारवाईत एकूण २३,४१,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे तसेच अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या मार्गदर्शना खाली, पोलीस स्टेशन वाढवणा (बु) चे प्रभारी



अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली.

लातूर जिल्ह्यात बेकायदेशीर जुगार व्यवसायावर आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष लक्ष ठेवण्यात येत होते. त्याच अनुषंगाने दिनांक २२/०३/२०२६ रोजी पोलीस स्टेशन वाढवणा (बु) येथील पथकास गोपनीय माहिती प्राप्त झाली की, मौजे मन्ना (उमरगा), ता. उदगीर येथील शिवारात संजय पाटील यांच्या शेताजवळील लिंबाच्या झाडाखाली काही इसम बेकायदेशीरपणे जुगार खेळत आहेत. सदर माहितीची खात्री करून पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाड टाकली. सुमारे दुपारी १५.१५ वाजण्याच्या सुमारास पोलीसांनी छापा टाकला असता आरोपी मंडळी तिर्रट नावाचा जुगार पत्त्यांच्या साहाय्याने खेळत व खेळवित असल्याचे आढळून आले.

सदर कारवाईत खालील आरोपींचा सहभाग आढळून आला बसून आरोपींना अटक करण्यात आली आहे ज्यामध्ये प्राधान्याने संभाजी दिगांबर पाटील (वय २८ वर्षे, रा. डाऊळ, ता. उदगीर),शिवकांत विश्वनाथ मिरजगावे (वय ३३ वर्षे, रा. खेर्डा, ता. उदगीर), शिवकुमार राजेंद्र शेळके (रेड्डी) (वय ३८ वर्षे, रा. टाकळी, ता. उदगीर),
लईकोद्दीन शाहबुदीन चौधरी (वय ५२ वर्षे, रा. उदगीर),विलास दशरथ दहीकांबळे (वय ३५ वर्षे, रा. हाळी, ता. उदगीर),ज्ञानेश्वर नरसिंग सारोळे (वय २७ वर्षे, रा. निडेबन, ता. उदगीर),
या प्रकरणात काही आरोपी फरार झाले असून त्यामध्ये अजित श्रीधर राठोड,बालाप्रसाद ऊर्फ प्रविण सत्यनारायण गिल्डा,गोविंद बाबुराव चव्हाण (रा. निडेबन),पवन सत्यनारायण गिल्डा,रुषीकेश वाघमारे (रा. खेर्डा) यांचा समावेश असल्याचे पोलीस प्रशासनाचे म्हणणे आहे.

सदर कारवाईदरम्यान पोलीस पथकाने जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य (पत्ते, इतर साधने) रोख रक्कम २१,५०० रुपये तसेच ज्या ठिकाणी जुगार चालू होता त्या ठिकाणी आढळलेली १० चारचाकी/दुचाकी वाहने (अंदाजे किंमत २३,२०,०००/-) असा एकूण २३,४१,५००/- जप्त करण्यात आला आहे.
या प्रकरणी पोलीस स्टेशन वाढवणा (बु) येथे गुन्हा क्रमांक ६९/२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवलदार बळदे हे करीत आहेत.
सदर धाडसी कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड, पोलीस अंमलदार बळदे, शिवप्रताप रंगवाळ, यांनी केली आहे. सदर प्रकरणातील अटक आरोपींवर कायदेशीर कारवाई सुरू असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक कार्यरत करण्यात आले आहेत. अशी माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे.

# मराठा सेवा संघाच्या हदगांव तालुका अध्यक्षपदी शाहीर गजानन जाधव वाटेगावकर यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

मराठा सेवा संघ या वैचारिक संघटनेच्या हदगाव तालुकाध्यक्षपदी शाहीर गजानन जाधव यांची निवड सर्वानुमते करण्यात आली आहे व नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. तसेच मराठा सेवा संघाच्या जिल्हाउपाध्यक्ष पदी प्रा. डॉ. रामेश्वर मोरे यांची निवड करण्यात आली आहे.यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष अभिवक्ते शिवश्री सतीश जाधव,
केंद्रीय कार्यकारणीची सदस्य शिवश्री शेरा पाटील.
विभागीय अध्यक्ष शिवश्री व्ही. टी.शिंदे. नांदेड जिल्हा सहसचिव शिवश्री राम डाखोरे,या वेळी मराठा सेवा संघाचे वरिष्ठ



पदाधिकारी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते अजय चव्हाण,शिवपार्वती कौटुंबिक भोजनगृहाचे संचालक त्रिभुवन चव्हाण हे उपस्थित होते. गेल्या १५ ते १६ वर्षापासून ग्रामीण भागातील अनेक गाव खेड्यात शाळा,महाविद्यालयात जाऊन प्रबोधनाच्या माध्यमातून मराठा सेवा संघाच्या विवेकीविचाराची रुजवण व सर्व कक्षाचे कार्य वाढवण्याचे काम अविरतपणे करून महाराष्ट्रात शाहिरीच्या माध्यमातून अनेक ठिकाणी प्रबोधनाचे कार्य केल्यामुळे स्वच्छ चारित्र्य व निर्व्यसनी निरभ्र स्वभाव असल्यामुळे सदरील पदाची जबाबदारी शिवश्री गजानन जाधव वाटेगावकर यांना देण्यात आली आहे.तर प्रा.डॉ. रामेश्वर मोरे व गजानन जाधव तालुक्यासह जिल्ह्यातून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# महिला आयोगाच्या अध्यक्षपदी तृप्ती देसाई यांची नियुक्ती करा–मगदूम शेख यांची मुख्यमंत्री यांना विनंती

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हनेगाव । संतोष चिद्रावार लोणीकर**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय सामाजिक कार्यकर्त्या भुमाता ब्रिगेडच्या संस्थापिका सौ. तृप्तीताई देसाई यांना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यासाठी भुमाता ब्रिगेडचे नेते मगदुम भाई शेख हनेगावकर यांनी मुख्यमंत्री यांना ईमेलद्वारे विनंती अर्ज केले आहे.



तृप्ती देसाई यांनी महिला सक्षमीकरण आणि, महिला हक्कांसाठी सातत्याने कार्य करीत आहेत. महिलांना न्याय हक्कासाठी अधिकारासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे.या कार्यामुळे अनेक महिलांना न्याय मिळाला असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांचा मोबाईलचा वाटा आहे. आणि समाजसेवेच्या मागणीमुळे त्या या पदासाठी योग्य उमेदवार ठरवू शकतात कृपया या विनंतीचा सकारात्मक विचार करून तृप्ती देसाई यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करावी. अशी मागणी मगदूम भाई शेख हनेगावकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेलद्वारे विनंती केली.

# उमरी खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीचा बेलदारा येथे प्रचार सभा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**

उमरी खरेदी विक्री संघाची निवडणूक लागली असुन दि २९ मार्च २०२६ रोजी मतदान आहे. त्यां अनुषंगाने नांदेड जिल्ह्याचे लोकनेते माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार **मा अशोकराव चव्हाण साहेब** यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच **मा.आ.राजेशजी पवार** साहेब यांच्या नेतृत्वखाली पॅनल प्रमुख **मारोतराव कवळे गुरुजी** यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी नागराध्यक्ष संजय कुलकर्णी, डॉ विक्रम देशमुख, ज्ञानेश्वर पा सावंत, अमोल पाटील ढगे,बापूसाहेब पाटील कौडगावकर यांच्या नियोजनातून गावनिहाय बैठक घेऊन गावातील मतदारांना अहवान करून मतदानरूपी आशीर्वाद घेतांना यावेळी गावातील सर्व प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते



**सहकारी संस्थेचे उमेदवार**

१.ढगे राजश्री भगवान २.गायकवाड दादाराव गणपती ३.हिवराळे बाबुराव पुंडलिक ४ मोरे अशोक माधवराव ५ आरसेवाड अंजनबाई दत्ता,६ पवळे माधवराव काळबा

**व्यक्तिगत सभासद उमेदवार**

१) सरसे गणेशराव केशवराव
२) मोहनराव दत्तराम सावंत
३)जाधव चंद्रकलाबाई विठ्ठल
४) गोणेकर बालाजी गणपती
५)पांचाळ मारोती संभाजी

सहकार बचाव च्या वरील सर्व उमेदवारवाना शिलाई मशीन या निशाणी वर बटन दाबून विजयी करा. असे आवाहन शेतकरी नेते उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी यांनी मतदारांना केले आहे.

# कारचा कट अन् कुत्रा आडवा आल्याने अपघात; दोन जण ठार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । आकाश सोनवणे**

गेवराई तालुक्यातील कोपरा येथून पाचेगाव येथे जात असताना एका कार चालकाने कट मारल्याने व त्याच वेळी कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वाराने ब्रेक लावल्यामुळे अपघात झाला. यात दोघांच्या मेंदुला गंभीर दुखापत होऊन मृत्यू झाल्याची घटना वसंत नगर तांडा परिसरात घडली.
गेवराई तालुक्यातील कोपरा येथील श्रीराम आजिनाथ मते (३५), पुरुषोत्तम संतराम मते (६५) अशी मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहे. हे दोघे दुचाकीवरून पाचेगाव येथे जात होते. यावेळी वसंतनगर तांडा जवळपास एका कार चालकाने त्यांच्या दुचाकीला कट मारला.याचवेळी दुचाकी बाजूला घेत असतानाच अचानक कुत्रा आडवा आल्याने श्रीराम मते यांनी दुचाकीचे ब्रेक लावले. यावेळी नियंत्रण सुटून दोघे रस्त्यावर पडल्याने दोघांच्या मेंदूला गंभीर दुखापत





झाली. त्यांना बीड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर व पुन्हा नंतर बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र, सोमवारी पहाटेच्या सुमारास श्रीराम मते यांचे निधन झाले तर त्यानंतर सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास पुरुषोत्तम मते यांचे निधन झाले. दोघांवरही गावातील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. श्रीराम यांच्या पश्चात पत्नी, भाऊ आई-वडील एक मुलगा असा परिवार आहे. पुरुषोत्तम यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, बहिणी असा परिवार आहे.

## गोंडपिपरीत औद्योगिक स्फोट! एमआयडीसीसाठी शासनाचे राजपत्र जाहीर

# आमदार देवराव भोंगळे यांचा पाठपुरावा यशस्वी १२ गावांतील हजारो युवकांना रोजगाराची मोठी संधी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिध्देश्वर केंद्रे**

गोंडपिपरी तालुक्याच्या विकासाला मोठी चालना देणारा ऐतिहासिक निर्णय राज्य शासनाने घेतला असून, एमआयडीसीसाठी अधिकृत राजपत्र जाहीर करण्यात आले आहे. आमदार देवराव भोंगळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्षात येत असून, संपूर्ण तालुका आता औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे.
राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार करंजी, चक पेल्लुर, वडकुली, चक वडकुली, सिर्सी देऊळवार, चेक बेरडी, बोरगाव, धानापूर, चक बोरगाव, लिखीतवाडा, वढोली आणि खरारपेठ या १२ गावांतील तब्बल ३३४१.४८४ हेक्टर क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. याआधी हे क्षेत्र केवळ १४ हेक्टर इतके मर्यादित होते.

दादाने वादा पाळला – जनतेत समाधान

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत दिलेला गोंडपिपरीत उद्योग आणणार हा शब्द आमदार भोंगळे यांनी प्रत्यक्षात उतरवला आहे. विधिमंडळात सातत्याने प्रश्न उपस्थित करून तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी पाठपुरावा करून त्यांनी हा प्रकल्प मंजूर करून घेतला.

हजारो तरुणांना रोजगाराची संधी

एमआयडीसीमुळे स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार असून, शेतकरी कुटुंबातील युवकांनाही उद्योगांमध्ये प्राधान्य देण्याचा आग्रह आमदार भोंगळे यांनी धरला आहे. राष्ट्रीय महामार्ग ३५३ बी लगत असलेला हा परिसर उद्योगांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

गोंडपिपरी होणार विदर्भातील औद्योगिक हब

प्रदूषणमुक्त आणि मोठ्या गुंतवणुकीचे उद्योग येथे आणण्याची तयारी सुरू असून, लवकरच देश-विदेशातील नामांकित कंपन्यांचे प्रकल्प येथे उभे राहतील. त्यामुळे गोंडपिपरीचे अर्थकारण मजबूत होऊन तालुक्याची ओळख औद्योगिक केंद्र म्हणून निर्माण होणार आहे.

दादाचा वादा सत्यात उतरतोय – आमदार भोंगळे

गोंडपिपरीतील तरुणांच्या हाताला काम देणे हे माझे ध्येय होते. आज एमआयडीसीला अधिकृत मान्यता मिळाल्याने ते स्वप्न साकार होत आहे. येत्या काळात हा भाग विदर्भातील प्रमुख औद्योगिक केंद्र बनेल, असा विश्वास आमदार देवराव भोंगळे यांनी व्यक्त केला.




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933